# बाकी शून्य' या कादंबरीतील तत्त्वज्ञान : एक अभ्यास

**डॉ. राहुल भा. पाटील**
मराठी विभागप्रमुख
गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जव्हार, जि. पालघर
चलभाष क्र.- ९६२३०९२११३
ईमेल- patilrahulb14@gmail.com

---

**गोषवारा :**

*मराठीमध्ये 'कोसला'पासून अस्तित्ववादी कादंबऱ्यांचा प्रवाह निर्माण झाला. या प्रकारच्या साहित्यात मानवी जीवनाबद्दलचे मुलभूत चिंतन केलेले दिसून येते. 'बाकी शून्य' या कादंबरीतही मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान जयराज सरदेसाई या नायकाच्या जीवनप्रवासाच्या माध्यमातून लेखकाने मांडलेले आहे. ही कादंबरी त्याच्याभोवती फिरते. त्याने खूप जग, अनेक स्तरातील, वेगवेगळ्या पद्धतीने जगणारी विविध वयोगटातील माणसे खूप जवळून बघितलेली आहेत व खूप सारे वाचन, चिंतन करून तो वयाच्या २९व्या वर्षी स्थितप्रज्ञ अशा पातळीवर येऊन पोहोचलेला आहे. जयराज सरदेसाई या पात्राच्या प्रवासातून लेखकाने आयुष्याचे प्रयोजन नेमके काय असते? सत्याचा शोध लागू शकतो का? केव्हा? आयुष्याला काही अर्थ आहे का? अशा प्रश्नांचा शोध घेतलेला दिसून येतो.*

---

**प्रस्तावना :**

'बाकी शून्य' ही २००० नंतरच्या काळातील एक अतिशय महत्त्वाची लक्षवेधक अशी कादंबरी आहे. या कादंबरीचे लेखक कमलेश वालावलकर हे असून ती २००५ साली राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेली आहे. या कादंबरीचे निवेदन हे आत्मचरित्रात्मक स्वरूपाचे आहे. मात्र हे आत्मचरित्र लेखकाचे नसून या कादंबरीचा नायक स्वतः त्याचे आत्मचरित्र वयाच्या २९व्या वर्षी लिहित आहे, अशी कल्पना लेखकाने केलेली आहे. वास्तविक आत्मचरित्र हे आयुष्यातील अनेक चढउतार पाहिल्यानंतर, अनेक अनुभव घेतल्यानंतर उतारवयात म्हणजे वयाच्या साधारणतः ५५-६० नंतर जेव्हा फार काही करण्यासारखे शिल्लक राहिलेले नसते व सांगण्यासारखे मात्र बरेच काही असते तेव्हा लिहिले जाते. ते लिहिताना जीवनाच्या विविध घटनांवर प्रकाश टाकला जातो. पण या कादंबरीचा नायक जयराज सरदेसाई मात्र २९व्या वर्षीच त्याचे आत्मचरित्र लिहित आहे, ही बाब इथे ध्यानात घेण्यासारखी आहे. इतक्या कमी वयात त्याने जे विविध अनुभव घेतलेले आहेत, त्याच्या आयुष्यात जे असंख्य स्त्री-पुरुष आलेले आहेत, त्यांचे विविधांगी जीवन, जगण्याच्या तऱ्हा त्याने खूप जवळून बघितलेल्या आहेत. मुळात तो लहानपणापासूनच खूप हुशार, संवेदनशील असल्याने त्याला जीवनाचा अर्थ खूप लवकर लक्षात येऊन गेलेला आहे आणि तो अर्थ असा आहे की 'सर्व अर्थशून्य, निरर्थक आहे. शेवटी 'शून्य'च उरणार आहे'. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तो हा अर्थ फक्त समजून घेत नाही तर नि:संग होऊन शेवटी तसा जगू लागतो. कुटुंब, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, जात, धर्म, पैसा, यश, स्त्रीसंग, मालकी हक्क या सर्वांच्या पलीकडे निघून जातो.



Research Hub International Journal

**शोधनिबंधाचा मुख्य भाग :**

'बाकी शून्य' या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेच्या आदल्या पानावर लेखकाने महायान संप्रदायाच्या विचारधारेप्रमाणे 'निर्वाण' म्हणजे काय ते सांगितलेले आहे. ते असे- "महायान पंथातील माध्यमिक संप्रदायानुसार 'तथता' म्हणजे अंतिम सत्य. त्यांनी त्यास 'शून्य' असेही म्हटले आहे. त्याचा अर्थ, अंतिम सत्य हे निर्गुण, निराकार, अनिर्वाच्य, अनिर्देश्य आहे, असा होतो. 'तथता' हे त्याचे स्वरूप. म्हणजे, ते आहे तसेच आहे. ते 'असे आहे' आणि 'तसे नाही' म्हणून सांगता येणार नाही. ते केवळ अनुभाव्य आहे आणि या अनुभवालाच माध्यमिक 'निर्वाण' म्हणतात." याचा अर्थ अंतिम सत्याचा अनुभव घेणे म्हणजेच 'निर्वाण' प्राप्त करणे, असा होय. या कादंबरीतील नायक जयराज सरदेसाई कादंबरीच्या शेवटी त्याच्या वयाच्या एकोणतिसाव्या वर्षीच त्याच्या वागण्या-बोलण्याच्या, जगण्याच्या पद्धतीवरून या अवस्थेला पोहचल्यासारखा वाटतो. पण इथपर्यंत त्याचा जो प्रवास घडून आलेला आहे, तो खूप महत्त्वाचा आहे.

जयराज सरदेसाई याचा जन्म एका ब्राह्मण कुटुंबात झालेला आहे. त्याचे कुटुंब हे सांगली या शहरात श्रीमंत व्यापारी म्हणून खूप प्रसिद्ध आहे. तो लहानपणापासूनच खूप अभ्यास करत नसला, खोडकर, खेळकर असला तरी दरवर्षी परीक्षेत पहिला येत राहतो. त्याला दिवसभर खेळायला, बागडायला आवडते. तो वक्तृत्व स्पर्धा, क्रिकेटच्या स्पर्धा, नाट्यस्पर्धा अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतो व प्रत्येक ठिकाणी यशस्वी ठरतो. दहावीच्या बोर्डात तो मेरिटमध्ये येतो. कॉलेजला गेल्यावर नाटकांचे दिग्दर्शन करायला लागतो. कधी खूप यशस्वी होतो. तर कधी ग्रुपमधील सहकाऱ्यांच्या चुकांमुळे अपयशीही होतो. तो प्रचंड वाचन करत राहतो. अनेक चित्रपट पाहतो. वेगवेगळ्या प्रकारच्या, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तरातील मुलांमध्ये राहून लहानाचा मोठा होतो. यामुळे त्याने अनेक जणांचे जीवन खूप जवळून पाहिलेले, अनुभवलेले असते. तो हे सर्व करत असताना अनेकदा कंटाळत राहतो. त्याला त्याच त्याच गोष्टींचा, कामांचा भयंकर कंटाळा येत राहतो. मग त्यावर उपाय म्हणून तो वेगवेगळ्या प्रकारची कामे करत राहतो. पुढे इंजिनियरिंग करत असताना तो एका वर्तमानपत्राचा उपसंपादक बनतो. इंजिनियरिंग झाल्यावर तो एका चित्रपटाचा साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करतो. मध्ये तो साबण तयार करून ते विकायचा धंदा करतो. त्यात कंटाळा आल्यावर तो नाशिकमध्ये एका कंपनीत मार्केटिंग क्षेत्रात कामाला येतो.

नाशिकच्या कंपनीमध्ये तो त्या कंपनीच्या हीट एक्सचेन्जर्सचे मार्केटिंग करतो. वेगवेगळ्या कंपन्यांशी संपर्क साधून त्यांना त्याचे महत्त्व, गुणवत्ता पटवून देऊन, स्वतःच्या बुद्धिकौशल्याने त्यांच्याशी घासाघीस करून मूळ किंमतीवर कमीत कमी सवलत देऊन त्या कंपन्यांशी करार घडवून आणतो. याचा तो ज्या कंपनीत काम करत असतो, त्यांना खूप फायदा होतो. तिथले अधिकारी, सहकारी सर्वजण त्याची उपयुक्तता, महत्त्व समजून त्याच्याशी वागतात. त्याला प्रमोशन मिळते. या कामानिमित्त त्याला इंदौर, दिल्ली, मुंबई, जबलपूर अशा अनेक ठिकाणी जायला, फिरायला मिळते. इंदौरमधील एका कंपनीतील गोन्सालवेस व त्याचा बॉस छत्रे हे त्याचे मार्केटिंग कौशल्य, बुद्धिमत्ता बघून खूप प्रभावित होतात. ते त्याला त्यांच्या कंपनीत सध्याच्या पगाराच्या तीन पट पगार देऊन नोकरीची ऑफर देतात. पण तो 'विचार करून सांगतो', असे उत्तर देतो व नंतर नकार देतो. पुढे तो ज्या कंपनीत काम करत असतो ती कंपनी त्याला कन्फर्म करणार असते. त्या आधीच तो राजीनामा द्यायचा व हे क्षेत्र सोडायचा निर्णय घेतो. कारण या क्षेत्रात येणारी स्थिरता, सुरक्षितता, तोचतोपणा याचा त्याला कंटाळा यायला लागलेला असतो. वास्तविक या क्षेत्रात तो खूप प्रगती करणार, खूप वरची पदे लवकर मिळवणार अशी चिन्हे दिसायला लागलेली असतात. पण तिथे काम करत असताना शिवाजी नावाचा MPSC, UPSC या परीक्षांचा अभ्यास करणारा त्याचा रूम पार्टनर

त्याला या परीक्षांची, प्रशासनात गेल्यावर लोकांसाठी काहीतरी अर्थपूर्ण करता येते असे सांगून त्याच्या मनात या परीक्षांबद्दल आकर्षण निर्माण करतो. त्यामुळे तो कंपनी क्षेत्र, नियमित पगार, बढत्या, प्रगती, सुरक्षितता हे सर्व सोडून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी पुण्याला जातो.

या परीक्षांच्या अभ्यासाच्या निमित्ताने भारताचा इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान, विज्ञान अशा अनेक विषयांचा त्याला मुळातून अभ्यास करावा लागतो. त्याच्या मूळच्याच अभ्यासू, संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला, बुद्धीला या अभ्यासामुळे अधिक खाद्य मिळते. हे सर्व केल्यानंतर सुद्धा पुढे काय?, आयुष्याचे प्रयोजन काय? असे प्रश्न त्याला पडतच राहतात. या क्षेत्रातसुद्धा प्रचंड मोठा भ्रष्टाचार आहे, लोकं परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी पेपर फोडून टाकतात. अशा पद्धतीने भ्रष्टाचार करून अनेक जण प्रशासनात जातात, हे वास्तव तो इथे बघतो. या दरम्यान एक अतिशय अभ्यासू, सुंदर, श्रीमंत, यशस्वी असलेल्या विनय नावाच्या मुलाची NDAची परीक्षा उत्तीर्ण होऊनही रंगाधीनतेमुळे NDAमध्ये निवड होत नाही. म्हणून तो आत्महत्या करतो. या घटनेचा जयराज सरदेसाईला म्हणजेच कादंबरीच्या नायकाला जबरदस्त धक्का बसतो. यानंतर तो मृत्यू, जीवनाचा अर्थ, प्रयोजन, माणसाचे अस्तित्व अशा विषयांचे खूप चिंतन करतो.

पण त्याची जी विशिष्ट मानसिकता, तत्त्वज्ञान असते ते त्याला एका क्षेत्रात स्थिर होऊ देत नाही. त्याचे जीवन बघत असताना मंगेश पाडगावकर यांच्या 'जिप्सी' कवितेतील निवेदक आपल्यासमोर उभा राहतो.

या काळात याच्यापेक्षा काहीतरी भव्य, काहीतरी अर्थपूर्ण करण्याची त्याची इच्छा असते. नोकरी, पदोन्नती, पैसा, सुरक्षितता, स्थिरता, लग्न, मुलं, वंशविस्तार हे त्याला काही खरं वाटत नाही. लोकं या गोष्टींसाठी झटतात. यातच आयुष्याची सार्थकता मानतात. पण त्याला हे अतिशय भीषण व विचित्र वाटते.

खरं तर त्याच्या आयुष्यात यश, पैसा, प्रगती, मुलींची-स्त्रियांशी शारीरिक संबंध, मैत्री, कौतुक अशा अनेक गोष्टी आलेल्या असतात. त्या त्या वेळेस तो त्यांचा उपभोगही घेतो. अगदी सुरुवातीला फार काही कळत नसताना तो आठवी-नववीत म्हणजे पौगंडावस्थेत असताना पिंकी नावाची त्याच्यापेक्षा थोडी मोठी असलेली मुलगी त्याच्याशी खेळत असताना, नंतर त्यांच्या गल्लीत एकाकडे टीव्ही येतो तेव्हा गर्दीत नंतर गच्चीवर, तिच्या घरात त्याच्याकडून आपल्या शरीराशी चाळे करून स्वत:चे समाधान करून घेते. त्याच गर्दीत नम्रता ही कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असलेली त्याच्यापेक्षा मोठी असलेली मुलगी एकदा त्याच्याशी लगट करते. पुढे कॉलेजला असताना बंगलोरला तो एका नातेवाईकाच्या लग्नाला गेलेला असतो. तेथेही रात्रीच्या अंधारात झोपताना त्याची एक चुलत बहीण चारू ही रात्री त्याच्याशी लगट करून स्वत:चे शारीरिक समाधान करून घेते. पुढे हा कीर्ती, निशा, मिता अशा अनेक मुलींच्या प्रेमात पडत राहतो. त्या त्या वेळेस रात्रंदिवस त्या मुलींच्या विचारांमध्ये गुंतून राहतो. दहावीच्या वर्गात असताना त्याचे कीर्तीवर खूप प्रेम असते. पण त्याचा प्रेमभंग होतो व पुढे कॉलेज करत असताना बराच काळ हे दु:ख त्याला ग्रासून राहते. या मुलींशी त्याचे प्रेम हे भावनिक पातळीवर राहते.

इंजिनियानिंगला असतानाच नाटकांमध्ये भाग घ्यायचा तेव्हा त्याच्या आयुष्यात मृणाल नावाची मुलगी आलेली असते. तो तिच्या प्रेमात पडतो. तीही त्याच्यावर जीवापाड प्रेम करू लागते. त्याच्याशी लग्न करायला तयार असते. त्याला काही काळ तिचे आकर्षण वाटते. त्याला तो प्रेम समजून घेतो. त्यांच्यात शारीरिक संबंधही येतात. तिला तो लग्नाचे आश्वासनही देतो. ती त्याच्यासाठी कितीही काळ थांबायला तयार असते. तो तिच्याशी लग्न करता यावे म्हणून नाशिकला कंपनीमध्ये नोकरीही करायला जातो. पण तिच्यात अडकून पडत नाही. पुढे आपले हिच्याशी किंवा कुणाशीच जमणार नाही, हे त्याच्या लक्षात येते. स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाला सुरुवात

करायच्या आधी तो तिला दुसऱ्याशी लग्न करायला सांगून तिला तसाच रडत असतानाच्या अवस्थेत सोडून तिला आधार न देता निघून जातो.

तिच्याव्यतिरिक्त त्याचे दोन-तीन स्त्रियांशी शारीरिक संबंध येतात. अनेकांशी मैत्री होते. त्या त्याच्या जणू काही प्रेमात पडतात. त्याच्यासाठी काहीही करायला तयार असतात. इंजिनियरिंग झाल्यावर FTII ला प्रवेश घ्यायच्या आधी तो वर्तमानपत्राच्या क्षेत्रात काही महिने काम करतो. तिथे देवयानी नावाची एक खूप यशस्वी पत्रकार मुलगी त्याच्या संपर्कात येते. ती त्याच्यापेक्षा सहा वर्षांनी मोठी असते. ती इंग्रजी पत्रकारिता करत असते. ती मूळची दिल्लीची असते. पण पुण्यात पत्रकार असते. तिचे वडील कोट्यधीश असतात. घरात वडील उद्योगपती, एक काका दक्षिण आफ्रिकेत उद्योगपती, एक खासदार, भाऊ अमेरिकेत नासामध्ये, एक भाऊ कलेक्टर असते. ती तिच्या क्षेत्रातील खूप कमी लोकांशी मैत्री करून असते. पण ती स्वतः जयराजशी मैत्री करते. अनेकदा त्याच्यासोबत वेगवेगळे चित्रपट पाहायला जाते. त्याच्यासोबत अनेकदा जेवते. बियर पिते. त्याला समागमासाठी प्रपोज करते. पण तो मृणालमध्ये अडकलेला असल्याने त्याला ही गोष्ट म्हणजे मृणालशी प्रतारणा वाटते. म्हणून तो ते नाकारतो. पुढे ती त्याच्यासाठी स्वयंपाक करते. त्याला स्वतः भरवते. तिचा स्वभाव नसताना त्याच्यासाठी काही प्रमाणात भावूकही होते. कादंबरीच्या शेवटी ती त्याच्याशी लग्न करते.

पुढे एका चित्रपटाचा साहाय्यक दिग्दर्शक म्हणून तो काम करतो. तिथे एक अतिशय श्रीमंत अनोळखी मुलगी काही दिवस येत राहते. एके दिवशी तिच्या मोठ्या कारमध्ये ती त्याला घेऊन जाते व निर्मनुष्य ठिकाणी कार उभी करून त्याच्या लक्षात येते न येते तेवढ्यात त्याच्याशी लगट करते. संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत त्यांच्यात तब्बल चार वेळेस शारीरिक संबंध येतात. पण दुसऱ्या दिवसापासून ती मुलगी त्याला कुठेही दिसत नाही. त्याला तिचे नाव, पत्ता काहीच माहिती नसते.

त्यापैकी नाशिकला कंपनीत कामाला असताना २२ वर्षांपासून विवाहित असलेली, जिला कॉलेजला जाणारी मुलगी आहे, जी एका मोठ्या व्यावसायिकाची पत्नी आहे अशा निकिता नावाच्या महिलेच्या हा संपर्कात येतो. ती जयपेक्षा कितीतरी वर्षांनी मोठी असते. पण खूप सुंदर, हुशार व बोल्ड असते. तिचे पती व्यवसायाच्या निमित्ताने अनेकदा बाहेर राहतात. मुलगीही कॉलेजला, कधी टूरला जाते. या दोघांमध्ये अनेकदा शारीरिक संबंध येतात. एकदा तर तीन दिवस ते रात्रंदिवस एकमेकांच्या संपर्कात राहतात. दोघे एकमेकांचा यथेच्छ उपभोग घेतात. येथेच त्याच्या कंपनीत ममता नावाची एक मुलगी रिसेप्शनिस्ट म्हणून कामाला असते. ती पैशांसाठी त्याच कंपनीतील दोन-तीन जणांसोबत शारीरिक संबंध ठेवते. यालाही ती एकदा चित्रपट बघायला सोबत घेऊन जाते. पण हा तिच्याशी एक माणूस म्हणून अगदी बरोबरीच्या नात्याने वागतो. ती कशी आहे, हे माहीत असूनही तिचा गैरफायदा घेत नाही. ममताला अशी चांगली वागणूक कुणीच दिलेली नसते. म्हणून ती त्याला घरी जेवायला बोलावते व त्याला चांदीचे ब्रेसलेट भेट म्हणून देते. तिच्या मनात त्याच्याविषयी वेगळा आदरभाव, प्रेम निर्माण होते. त्याच्याबद्दलचे प्रेम ती व्यक्त करते. नाशिक सोडून जाताना निकिता त्याला मिठी मारून हमसून हमसून रडते. तर ममता त्याला "मी तुला आयुष्यात कधीही विसरणं शक्य नाही" (पृ. ३१०) असे म्हणते.

पुढे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करू लागल्यावर त्याच्या जीवनात सॅली डिसुझा नावाची मुलगी येते. ती दक्षिण भारतातील मंगलोरची असते. UPSCचा अभ्यास करण्यासाठी मुंबईत आलेली असते. ती त्याची चांगली मैत्रीण होते. तिचे पदवीचे शिक्षण मानसशास्त्र या विषयातून झालेले असते. तो सुरुवातीला तिच्या प्रेमात पडतो. तसे तो अर्जुनकडे कबूल करतो. पण तो तिच्यामागे वाहवत जात नाही. अर्जुनही तिच्या प्रेमात पडलेला असतो.

Research Hub International Journal

जय अर्जूनला तिला प्रपोज करायला सांगतो व अगदी सहजपणे तटस्थ राहतो. मात्र तीच त्याच्या प्रेमात पडते.

या सर्व मुली/ महिला त्याला त्याच्या अगदी खाजगी अशा काम/ लैंगिक जीवनाबद्दल विचारत राहतात. एकदा सॅली त्याला असेच विचारते. तेव्हा त्यांच्यात जो संवाद झालेला आहे. तो त्याच्या या संदर्भातील स्वभावावर, त्याच्या एकूणच मानसिक वृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे. म्हणून तो मुळातून बघुयात.

सॅली जयला म्हणते, “One thing I find strange. I have’t seen an iota of lust in your eyes for me. Or for that matter any women.”

मी म्हटलं, “Feeling insulted?”

सॅली म्हणाली, “Not exactly but, obviously yeah!”

मी हसलो.

सॅली म्हणाली, “How many times you shag in a day?”

मी म्हटलं, “There were times when I used to do it twice thrice a day. But I haven’t shagged for the last whole year. In fact, I never felt the need.”

सॅली म्हणाली, “Don’t tell me that.”

मी म्हटलं, “Actually, I have gone beyond sex.”

“How many times have you had sex?”

“Not much. Four or five.”

“And that took you beyond it.”

“I had it in torrents. Very intense. And that is what matters.” (पृ. ३९९)

या दोघांमध्ये हा जो संवाद झालेला आहे. त्या वेळी जय हा २६-२७ वर्षांचा आहे. पण तो मात्र वासना, कामभावना यांच्या पलीकडे निघून गेलेला आहे. त्याला वैयक्तिक जीवनामध्ये पैसा, यश, वासनातृप्ती इ. गोष्टींची आवश्यकता राहिलेली नाही. कोणताही अनुभव दोन-तीन किंवा चार-पाच वेळेस घेतल्यानंतर त्याला त्या अनुभवात रस राहत नाही. पुन्हा पुन्हा तोच अनुभव घेण्याची त्याची प्रवृत्ती नाही. म्हणून त्याला शिक्षण, चित्रपट निर्मिती, मार्केटिंग, पत्रकारिता, लेखन, स्पर्धा परीक्षांचा अभ्यास अशा प्रत्येक क्षेत्रात थोडे दिवस काढल्यानंतर कंटाळा येऊ लागतो. त्यात आपण काहीतरी वेगळे करू शकू किंवा लोकं काही वेगळे करत आहेत, असे त्याला वाटत नाही. मुळात त्याला आयुष्याचे प्रयोजन काय?, आयुष्याला काही अर्थ आहे का? असे मानवी अस्तित्वाविषयीचे मुलभूत प्रश्न पडत राहतात. आपल्याला आयुष्य अर्थपूर्ण करता येईल का, याच्या शोधात तो अनेक क्षेत्रांमध्ये फेरफटका मारतो, त्या त्या ठिकाणी यशस्वीही होतो. पण त्या गोष्टींमधील त्याचा रस मात्र संपत जातो.

सॅली ही अनेक दिवस त्याच्या सहवासात राहिल्यानंतर ती मानसशास्त्र या विषयाची पदवीधर असल्याने ती त्याला “Why are you always so sorrowful, Jay? What makes you so sad?” असा प्रश्न विचारते. यावर तो उत्तर देतो की, “I am never sad. Why should I be? I don’t have any good reason to be” त्यानंतर ती त्याच्या स्वभावाविषयी पुढील निरीक्षण नोंदविते. “I don’t know that. But I know one thing. You are extremely unhappy. Suffering. And there is some impersonal reference to this suffering… universal reference? So it becomes all the more difficult to get rid of this misery. Personal grief has some solution. लेकीन इसका कोई इलाज नहीं. You can’t eradicate it. Because

Research Hub International Journal

you can't eradicate misery at all. In the process, you will become miserable. The only way is to put things into proper perspective. So do it." (पृ. ३९९) म्हणजे दु:खाला जर सार्वत्रिक संदर्भ असतील तर अशा दु:खातून सुटका होणे कठीण होऊन बसते. या प्रक्रियेत तू दयनीय बनशील. यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग ती त्याला सांगते व तो म्हणजे हे सर्व योग्य दृष्टीकोनातून मांडणे.

तिचे म्हणणे खरे ठरते. कारण त्यानंतर पुढील काही दिवसातच विनय नावाच्या एका अतिशय सुंदर, हुशार, यशस्वी, घराचा अतिशय श्रीमंत असलेल्या तरुणाची NDAची परीक्षा उत्तीर्ण होऊनही रंगांधळेपणामुळे निवड होत नाही म्हणून तो आत्महत्या करतो. या घटनेचा जयराजला जबरदस्त धक्का बसतो. तो जीवन, मृत्यू, जीवनाचे प्रयोजन, जीवनाचा अर्थ, इच्छामरण या विषयांचा खूप विचार करतो. या घटनेने व्यथित होऊन तो एक कथा लिहितो. या कथेत बाळ नावाचा विनयसारखाच तरुण, कर्तृत्त्ववान मुलगा मानसिकदृष्ट्या पूर्णपणे निरोगी व निकोप असूनही त्याचे अंतराळवीर व्हायचे एकमेव स्वप्न पूर्ण होऊ शकत नसल्याने आयुष्यात आता करण्यासारखे काहीच नसल्याने आत्महत्या करतो. असा आशय त्या कथेचा असतो. या कथेत त्याने बाळ व एक मानसोपचार तज्ज्ञ यांचा दीर्घ संवाद घेतलेला आहे. त्यातून आयुष्य, त्याचे प्रयोजन, मानवी अस्तित्त्व अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकलेला आहे. कथा लिहिल्यानंतर जयराज हा त्यातून मोकळा होत नाही तर याउलट त्याच्या आयुष्यातील लहानपणापासूनच्या जवळपास सर्वच व्यक्ती व घटना त्याच्या मेंदूत एकाच वेळी गर्दी करून लागतात. त्याच्या अप्रकट मनातून त्या प्रकट मनात येऊ लागतात. त्याच्या विचारांवर त्याचे नियंत्रण राहत नाही. तो त्याचे मानसिक संतुलन गमावून बसतो.

त्यानंतर तो जे काही करतो त्यामागे त्याचा कोणताही उद्देश राहत नाही. तो असंबद्ध, विचित्र वागू लागतो. कादंबरीच्या या भागाला लेखकाने 'कालातीत' हे नाव दिलेले आहे. दिवस-रात्र, सकाळ-संध्याकाळ, जवळचा-लांबचा यापैकी कसलेही भान त्याला राहत नाही. तो केव्हाही कुठेही भटकायला निघून जातो. नुसता भटकत राहतो. दिवसभर नुसता बसून राहतो. कुठेही, केव्हाही, काहीही खातो. त्याला लहान मुलासारखी सर्व गोष्टींमध्ये गंमत वाटू लागते. त्याचा मित्र अमोघ हा त्याला या काळात खूप साथ देतो. याच काळात त्याला अमोघच्या रूम पार्टनरचा एक रंगेल मित्र बुधवार पेठेत वेश्यांकडे घेऊन जातो. तिथे श्रीदेवी नावाच्या एका वेश्याबरोबर तो राहतो. पण त्याच्या मनात कामवासनेचा एक अंशही शिल्लक राहिलेला नसतो. ती सर्वकाही प्रयत्न करून थकते. पण हा त्यासाठी तयार होत नाही. त्यानंतर पूर्ण रात्रीचे पैसे मोजून त्या खोलीत नुसता बसून राहतो. दुसऱ्या दिवसापासून त्याचे दररोज बुधवार पेठेत जाणे सुरू होते. कुणासोबत करत काहीच नाही. तिथे बसून दिवस घालवतो व दिवसरात्र नुसता दारू पीत राहतो. बिड्या ओढत राहतो, तिथल्या सर्व मुलींचा व लोकांचा तो परिचयाचा होऊन जातो. तिथे एक वृद्ध वेश्या वारल्यावर तिचे अंतिम संस्कार करायला कुणीही तयर नसताना हा ते करतो. तो घाण, दुर्गंधी, बकालपण, त्याबद्दल त्रागा, दु:ख या सर्वांच्या पलीकडे निघून जातो. दारू पिऊन कुठेही पडून राहतो. त्याने उलट्या केल्यावर त्याचे तोंड, कपडे तसेच राहू लागतात. त्याला कशाचेच काही वाटत नाही. मृत्यूचा अनुभव घ्यावा असे त्याला वाटते. तेव्हा तो शांतपणे स्वतःच्या हाताची नस ब्लेडने कापून घेतो व मृत्यूची प्रक्रिया काय असू शकते, याचा अनुभव घेतो. पण त्यातून त्याचे मित्र त्याला वाचवतात.

त्याचा मित्र अमोघ त्याला मानसोपचार तज्ज्ञांकडे, डॉक्टरांकडे घेऊन जातो. पण काहीही निष्पन्न होत नाही. मग त्याला काहीतरी बाहेरचे असेल म्हणून तो कोकणात किंवा अन्यत्र अनेक बाबा बुवांकडे घेऊन जातो. तर तिथेही हा नुसता गोंधळ घालतो. एक दोन ठिकाणी तर ते बाबाच त्याच्याकडे दैवी, आध्यात्मिक शक्ती आहे

असे मानू लागतात. त्याच्याकडे वेश्यावस्तीत व पुढे तो जिथे राहील तिथे अनेक लोकं आशीर्वाद घेण्यासाठी, समस्या, संकटांवरील प्रश्नांची उत्तरे विचारण्यासाठी येत राहतात. त्याची सर्वत्र कीर्ती पसरते.

त्याचे मानसिक संतुलन बिघडल्यावर तो एकदा एका आलिशान हॉटेलमध्ये भरपूर जेवण करतो व स्कॉच वगैरेसारखी महागडी दारू पितो. पण द्यायला त्याच्याकडे पैसे नसतात. तेव्हा तिथे योगायोगाने त्याचा टोनी नावाचा एक जुना मित्र त्याला भेटतो. तो मोठमोठ्या उद्योजकांना पैसे, बायका पुरविण्याचे काम करतो. त्या रात्री तो जयला मिशेल नावाची एक अतिशय तरुण सेक्स वर्कर (कॉल गर्ल) पुरवतो. तिचा एका रात्रीचा भाव १०,०००/- रुपये असतो. ती देखील त्याच्या कामभावना जागृत करण्याचा व तिची ड्युटी करण्याचा पुरेपूर प्रयत्न करतो. पण त्याच्यावर कोणताही परिणाम होत नाही. तो रात्रभर तिच्याशी फक्त गप्पा करतो. सकाळी ती 'तुम्ही एक चांगले माणूस आहात', असे म्हणून निघून जाते. त्यानंतर मध्ये बऱ्याच गोष्टी घडतात. त्यानंतर तो एकदा पुण्याहून मुंबईला जातो. तेव्हा त्याला रस्त्यावर अचानक चक्कर येते व कुणीतरी त्याला एका हॉटेलमध्ये मिशेलकडे पोहचवून जाते. तिथे त्याला असे वाटते की, "आपल्याला काहीतरी कळतंय. काहीतरी नवं कळतंय. मग मला कळलं, प्रथमच कळलं, मी आहे, मीच आहे." (पृ. ४४८) यातून त्याला स्वतःच्या अस्तित्वाची एक नवी ओळख होते. त्यानंतर दोन दिवस तो नुसता बसूनच राहतो. मग त्याला आकडी येऊ लागतात. तो तासनतास बेशुद्ध राहू लागतो. डॉक्टरांकडे नेऊनही फार उपयोग होत नाही. पुढे एकदा बेशुद्ध पडल्यावर तो पाच महिने कोम्यात जातो. पाच महिने मिशेल काहीही संबंध नसताना त्याची सर्व काळजी घेते. या दरम्यान ती जयच्या डायरीतील फोन नंबर बघून त्याचा मित्र अमोघला बोलावून घेते. तोही ४-५ महिने त्याच्यावर लक्ष ठेवून राहतो.

पाच महिन्यानंतर जेव्हा तो कोम्यातून बाहेर पडतो. तेव्हा त्याचे केस वाढून गेलेले असतात. तो पूर्ण बारीक होऊन गेल्याने गालफडे आत गेलेले असतात. यानंतर तो काहीसा शहाणपणाने पण अतिशय स्थितप्रज्ञासारखा वागू लागतो. त्याला ज्ञान प्राप्त झाले आहे, असे अमोघ, मिशेल यांना वाटू लागते. अनेक लोकंही त्याच्याकडे आशीर्वाद घेण्यासाठी लांबून लांबून येत राहतात. गोपाळशेठ नावाचा एक व्यक्ती जयराज स्वामी यांनी आपल्याला आशीर्वाद दिला म्हणून आपण लाखो रुपयांचे शेअर्स विकत घेतले व त्याच दिवशी त्यांच्या किंमती खूप वाढल्याने करोडो रुपये कमाविले असे सांगतो व त्या बदल्यात जयराजला ड्रायव्हरसह मर्सिडीज कार देऊन जातो. मिशेल त्याला म्हणते की, "This is a very good profession Jay. You can be a Godman." पण तो प्रसिद्धी, पैसा यांच्या पलीकडे निघून गेल्याने तो लोकांना सांगून टाकतो की, "मी अत्यंत सामान्य माणूस आहे. बाबा, स्वामी काहीही नाही." (पृ. ४७२) तरीही लोकं येत राहतात, तेव्हा तो पुणे, सांगली, सातारा इकडे निघून जातो.

मिशेल त्याच्यावर प्रेम करू लागलेली असते. पण तो एखाद्या व्रतस्थासारखा वागत राहतो. तो पुणे, सांगली, सातारा असे करत परत मिशेलकडे येतो व तिच्याकडेच राहू लागतो. या दरम्यान तो सेंट्रिंगच्या कामावर जाऊ लागतो. हमाली करू लागतो. मुंबई सेन्ट्रलला हमालीचा अधिकृत परवाना मिळवतो. एकदा तो मिशेलला आपण लग्न करू, असे म्हणतो. पण ती प्रेम नेमके काय आहे हे मला पूर्णपणे कळले आहे आणि मला त्याला corrupt होऊ द्यायचे नाहीये. तसेच मला स्वतःचा शोध घ्यायचा आहे, असे सांगून त्याला सोडून ती त्रिवेंद्रम येथे निघून जाते. पण जाताना त्याच्या नावावर बँकेत २ लाख रुपये ठेवून जाते.

पुढे अशीच योगायोगाने त्याची व देवयानीची भेट होते. तो तिला ओळखत नाही. पण ती त्याला ओळखते. ती त्याच्याशी लग्न करते. ती व तिचे वडील, भाऊ किती श्रीमंत असतात, हे आपण वर पाहिलेले आहे. तरी ती हा निर्णय घेते. लग्नानंतर ते मलबार हिल येथे एका बंगल्यात राहायला जातात. तो तिला स्पष्ट सांगून टाकतो, "की बाई

तुझं आयुष्य तू चालूच ठेव. तुझे मित्र-मैत्रिणी काय हवा तो गोंधळ घाला. तू तुझ्या मित्रांबरोबर झोपायलाही मोकळी आहेस. वाटलं तर माझ्या मित्रांबरोबरही झोपू शकतेस. त्यासाठी माझ्यामागे लकडा नको.'' (पृ. ४७५) म्हणजे सर्व सुखे, यश, संपत्ती, स्त्रियांचा सहवास इ. गोष्टी त्याच्यासमोर हात जोडून उभ्या असतात. पण तो आता जीवनाचे वास्तव, सत्य काहीएक प्रमाणात समजून गेलेला आहे. म्हणून या सर्व गोष्टी तो नाकारतही नाही व स्वीकारतही नाही. सुख-दु:ख, यश-अपयश, गरिबी-श्रीमंती, जवळच्या व्यक्तींवर मालकी हक्क, मान-अपमान, असणे-नसणे, विचारांची संदिग्धता अशा सर्व गोष्टींच्या पलीकडे तो शेवटी निघून गेलेला आहे.

जयराज हा आयुष्यभर त्याच्या मित्र-मैत्रिणींसोबत किंवा एकटा असताना वाटेल तेव्हा वाटेल तितक्या वेळेस दारू, सिगारेट प्यालेला असतो. त्याचे मानसिक संतुलन ढळल्यावर तर त्याचा अतिरेक होतो. पण आता त्याला यापैकी कोणत्याही गोष्टींची आवश्यकता वाटत नाही.

**निष्कर्ष :**

जयराज सरदेसाई हा 'बाकी शून्य' या कादंबरीतील नायक आहे. ही कादंबरी त्याच्याभोवती फिरते. त्याने खूप जग, अनेक स्तरातील, वेगवेगळ्या पद्धतीने जगणारी विविध वयोगटातील माणसे खूप जवळून बघितलेली आहेत व खूप सारे वाचन, चिंतन करून तो वयाच्या २९व्या वर्षी स्थितप्रज्ञ अशा पातळीवर येऊन पोहोचलेला आहे. जयराज सरदेसाई या पात्राच्या प्रवासातून लेखकाने आयुष्याचे प्रयोजन नेमके काय असते? सत्याचा शोध लागू शकतो का? केव्हा? आयुष्याला काही अर्थ आहे का? अशा प्रश्नांचा शोध घेतलेला दिसून येतो. मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान या कादंबरीतून लेखकाने मांडलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- बाकी शून्य, कमलेश वालावलकर, मेनका प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २१ एप्रिल २०१५.


Research Hub International Journal